# ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ 32 /२०२५ दि. २५/०२/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, **ठाणेनगर** वाहतूक उपविभागाचे हद्दीत **साकेत मैदान व मुख्यालय** येथे **३५ व्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रिडा स्पर्धा २०२५ चे आयोजन** करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने दिनांक ०१/०३/२०२५ रोजी महाराष्ट्र राज्यातील मंत्री महोदय् तसेच सर्व जिल्हातील वरिष्ठ पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे:–

| | |
|---|---|
| प्रवेश बंद – | **१)** क्रिक नाक्याकडुन उर्जिता हॉटेल येथुन कोर्ट नाक्याकडे जाणाऱ्या सर्व वाहनांना **उर्जिता हॉटेल कट** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| पर्यायी मार्ग – | सदरची वाहने क्रिकनाका – सरळ उर्जिता हॉटेल – उजवीकडे वळण घेवुन ठाणे जेल रोड – डावीकडे वळण घेवुन G.P.O. या मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| प्रवेश बंद – | **२)** कोर्ट नाक्याकडुन पॅव्हेलियन हॉटेल मार्गे ठाणे सेंट्रल जेल कडे जाणाऱ्या दु चाकी, तीन चाकी, चार चाकी वाहनांना **कोर्ट नाका** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| पर्यायी मार्ग – | सदरची वाहने कोर्ट नाका येथुन डावीकडे वळण घेवुन G.P.O. मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| नो पार्कींग – | **उर्जिता हॉटेल ते कोर्ट नाका व कोर्ट नाका ते पॅव्हेलियन हॉटेल, जेल रोड या ठिकाणी रोडचे दोन्ही बाजुस दु चाकी, तीन चाकी, चार चाकी ही वाहने उभी करण्यास मनाई करण्यात येत आहे.** |

**सदर अधिसूचना दिनांक ०१/०३/२०२५ रोजी दुपारी १४:०० ते २३:०० वा. पावेतो अंमलात राहील.**

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१/वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे

CamScanner

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :– सपोआ ठाणे वाहतूक विभाग व पो.नि. नौपाडा, ठाणेनगर, कळवा, राबोडी वाहतूक उपविभाग, ठाणे शहर

CamScanner